# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक- २१०** **दिनांक १३/०७/२०२२**

## वेश्या दलालास अटक करुन महिलेसह एका अल्पवयीन मुलीची सुटका-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-नालासोपारा यांची कामगिरी

आचोळे पोलीस ठाण्याचे हद्दीत वेश्यादलाल नायजेरियन पुरुष हा सनशाईन हिल रामरहिम नगर, एव्हरशाईन हिल रोड, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर मुळ रा. बेनीन सिटी, अबुजा स्टेट, देश- नायजेरिया हा अल्पवयीन मुलीस पैशाचे आमिष दाखवुन त्याचे घरी वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन एका मुलीचे ५०००/- प्रमाणे पैसे घेवुन पिडीत मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास लावतो व त्याचा मोबदला म्हणुन पिडीत मुलींना १५००/- रु. देत असतो व ग्राहकांकडुन मिळणाऱ्या पैशातील उर्वरीत रक्कम तो स्वतःकडे ठेवतो अशी गुप्त माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पो.नि. श्री. संतोष चौधरी यांना मिळाली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षातील अधिकारी व अंमलदार यांनी बोगस गिहाईक व दोन पंचासह जावुन छापा कारवाई केली. सदर कारवाईमध्ये एक नायजेरियन पुरुष आरोपी नामे मायकल पिटर इजीवली वय २७ वर्ष यास ताब्यात घेण्यात आले आहे. सदर कारवाई दरम्यान एक अल्पवयीन नायजेरियन पिडीत मुलगी वय-१६ वर्षे व एक नायजेरियन पिडीत महिला वय-२२ वर्ष यांची सुटका करण्यात आली आहे. नमुद आरोपीताविरुध्द आचोळे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ३३१/२०२२ भा.द.वि.स. कलम ३६६(ए), ३७०(१), ३७२ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ सह पोक्सो ॲक्ट १७, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय), अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संतोष चौधरी, पोलीस निरिक्षक, पो.उप.नि. प्रकाश विक्रम निकम, पो.हवा. बापु पवार, पद्मने, महेंद्र शेटये, रोशन किणी, शिंदे, सुनिल पागी, म.पो.हवा. साक्षी डोइफोडे, म.पो.शि. काजल पाटील सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रति. कक्ष नालासोपारा यांनी केली.